



मुंबईतील मेट्रो रेल्वेच्या विद्यानगरी मेट्रो रेल्वे स्थानकाचे वेगाने सुरू असलेले काम आता पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. कामाबद्दल रेल्वेच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# मेट्रोची विद्यानगरी पाहिली का?

## सिव्हील काम ९२ टक्के तर सिस्टिमचे काम ६६ टक्के पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशातील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रो ३ चे काम वेगाने सुरू असून, याअंतर्गत असलेल्या विद्यानगरी मेट्रो स्थानकाने कामाचे बऱ्यापैकी टप्पे पार केले आहेत.

या स्थानकाचे सिव्हिल काम ९२ टक्के, तर सिस्टिमचे काम ६६ टक्के पूर्ण झाले आहे. कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे या कामाचा सतत आढावा घेत आहेत. नुकताच त्यांनी बीकेसी स्थानकाचा आढावा घेतला. आतापर्यंत जे काम झाले आहे; त्यावर समाधान व्यक्त केले.

- आंध्र प्रदेशातील श्री सिटीमध्ये मेट्रोच्या कारखान्यांत आठ डब्यांच्या मेट्रो तयार केल्या जात आहेत.
- एका गाडीतून अंदाजे २४०० प्रवासी प्रवास करू शकतील.
- पावसाळ्यात पुरेपासून बचाव करण्यासाठी पुरेशा प्रमाणात डि-वॉटरिंग पंपांची व्यवस्था करण्यात आली आहे.
- मेट्रो मार्गावर पावसाळ्याशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी आपत्कालीन नियंत्रण कक्षही स्थापन केला आहे.

### पहिला टप्पा

- आरे ते बीकेसी
- एकूण स्थानके : १०, ९ भुयारी, तर १ जमिनीवर
- अंतर : १२.४४ किमी
- आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे काम जवळपास पूर्ण होत आल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केला आहे. येत्या डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत मेट्रो ३ चा हा टप्पा (आरे ते बीकेसी स्थानक) पूर्ण होईल

### दुसरा टप्पा

- बीकेसी ते कफ परेड
- एकूण स्थानके : १७
- अंतर : २१.३५ किमी
- दुसरा टप्पा जून २०२४ पूर्वी पूर्ण केला जाईल.

### मेट्रो ३ कुणाला जोडणार?

- मेट्रो १, २, ६ आणि ९ यांना जोडणार
- मोनोरेलला जोडणार
- चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे जोडणार
- विमानतळांनाही जोडणार

**आपत्कालीन नियंत्रण कक्ष क्रमांक**
९१३६८०५०६५, ७५०६७०६४७७

**५** एकूण ट्रेनची संख्या झाली.

**४** ट्रेनची आणखी गरज आहे.